MHRT010010882024

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल तारीख | - | ११/१२/२०२४ | | |
| फैल तारीख | - | १२/१२/२०२४ | | |
| निकाल तारीख | - | २४/०३/२०२६ | | |
| कालावधी | - | वर्ष | महिने | दिवस |
| | | ०१ | ०३ | १२ |

**सत्र न्यायाधीश, रत्नागिरी यांचे न्यायालयात**

**{ सत्र न्यायाधीश व्ही.वाय.जाधव }**

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.४०/२०२४.**

**निशाणी क्रमांक २९.**

१) **श्री. भिमराव वसंत कांबळे,**
उ.व.सु.४० वर्षे, व्यवसाय- नोकरी,
रा.रुम नं.२०३, बी विंग, अर्जदार
द्वारका रेसिडेन्सी, फेज १, साटवली रोड,
मु.पो.ता.लांजा, जि.रत्नागिरी.

**विरुध्द**

१) **सौ.सारिका भिमराव कांबळे,**
उ.व.सु.३८, व्यवसाय -गृहिणी,

२) **कु.श्रुती भिमराव कांबळे,**
अ.पा.क.करिता आई सामनेवाली क्र.१ सामनेवाले
उ.व.सु.१७, व्यवसाय -शिक्षण,

३) **कु.श्रेया भिमराव कांबळे,**
अ.पा.क.करिता आई सामनेवाली क्र.१
उ.व.सु.१५, व्यवसाय -शिक्षण,

४) **कु.श्रावणी भिमराव कांबळे,**
अ.पा.क.करिता आई सामनेवाली क्र.१
उ.व.सु.१२, व्यवसाय -शिक्षण,
क्र.१ ते ४ राहणार- रुम नं.२०३, बी विंग,
द्वारका रेसिडेन्सी, फेज १, साटवली रोड,
मु.पो.ता.लांजा, जि.रत्नागिरी.

५) **सौ.वैशाली वसंत कांबळे,** सामनेवाले
उ.व.सु.६१, व्यवसाय -काही नाही,

६) **श्री.वसंत हिरा कांबळे,**
उ.व.सु.६७, व्यवसाय -काही नाही,
क्र.५ व ६ रा. बौध्दवाडी, मु.पो.आंजणारी,
ता.लांजा, जि.रत्नागिरी.

अर्जदार व सामनेवाला क्र.५ व ६ तर्फे विधिज्ञ श्री.एस.एस.थरवळ.
सामनेवाला क्र.१ ते ४ तर्फे विधिज्ञ श्रीमती पी.जे.पवार.

## न्या य नि र्ण य

(जाहीर दिनांक २४ मार्च २०२६)

**१.** प्रस्तुतचा अर्ज मुदत कायदा १९६३ कलम ५ अन्वये दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुत अर्ज मे.प्रथम न्यायदंडाधिकारी, लांजा येथील महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अर्ज क्र.११/२०२१ या प्रकरणात दि.०५/१०/२०२४ रोजी दिलेल्या नि.क्र.६ वरील अंतरीम आदेशाविरुध्द केलेल्या कलम २९ नुसारच्या अपील दाखल करणेसाठी झालेला ३७ दिवसांचा झालेला विलंब माफ करण्यासाठी दाखल केला आहे.

**२.** अर्जदार यांनी अर्जात असे कथन केले आहे की, अर्जदार हे कोकण रेल्वे

कॉर्पोरेशन लि. येथे नोकरीस असल्याने व त्यांनी वेळोवेळी मागणी करुन देखील रजा उपलब्ध न झाल्याने कागदपत्रांची पूर्तता वेळेवर करणे अशक्य बनले. तसेच दरम्यानच्या कालावधीत अर्जदार यास पाठदुखीचा त्रास सुरु झाला. त्यामुळे अर्जदाराला लांजा येथुन रत्नागिरी येथे प्रवास करुन येणे व वकीलांना प्रकरणाची माहिती देणे अशक्य बनले. या योग्य, न्याय्य व संयुक्तीक कारणास्तव अर्जदार यास प्रस्तुत अपिल दाखल करण्यास ३७ दिवसांचा विलंब झाला आहे. प्रस्तुत विलंब माफ होऊन मिळणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे बनले आहे. तरी म.कौं.हिं.सं. अर्ज क्र.११/२०२१ चे कामी नि.क्र.६ येथे दि.२५/१०/२०२४ रोजी केलेल्या आदेशाविरुध्द अपील दाखल करण्यास झालेला ३७ दिवसांचा विलंब माफ करण्याची विनंती केली आहे.

३. सामनेवाला क्र.१ ते ४ यांनी नि.७ अन्वये म्हणणे दाखल करुन सदर विलंब माफी अर्जास हरकत घेतली आहे. सामनेवाला क्र.१ ते ४ यांनी म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, अर्जदार यांना अपिल दाखल करण्यास ३८ दिवसांचा विलंब झालेला आहे. अर्जदार यांना मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, लांजा यांनी केलेल्या आदेशाची कल्पना होती. मे. लांजा कोर्टाने कौ.हिं.म.सं.अर्ज क्र.११/२०२१ चे कामी केलेला आदेश योग्य आहे. अर्जदार यांनी अर्जात नमूद केलेले कारण संयुक्तीक नाही. अर्जदार यांना सुट्टी न मिळाल्याने व दरम्यानच्या काळात अर्जदार यांना पाठदुखीचा त्रास झाल्याबाबतचे कारण पटण्यायोग्य नाही. तसेच याबाबतचे कोणतेही वैद्यकिय प्रमाणपत्र मे.कोर्टात दाखल नाही. अर्जदार यांचा अर्ज मंजूर केल्यास सामनेवाली क्र.१ ते ४ यांच्यावर अन्याय होणार आहे व सामनेवाली क्र.१ ते ४ यांचे पैशाच्या स्वरुपात भरुन न येणारे नुकसान होणारे आहे. त्यामुळे सामनेवाला यांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. सामनेवाला क्र.५ व ६ यांनी नि.९ येथे पुरशिस दाखल करुन अर्जदार यांनी दाखल केलेला प्रस्तुतचा अर्ज त्यांना मान्य व कबुल असल्याचे कथन केले आहे.

५. अर्जदार व सामनेवाला क्र.५ व ६ यांचेतर्फे विधिज्ञ श्री.एस.एस.थरवळ आणि

सामनेवाला क्र.१ ते ४ तर्फे विधिज्ञ श्रीमती पी.जे.पवार यांचा युक्तीवाद ऐकला.

६. अर्जाचे व सामनेवाला यांच्या म्हणण्याचे अवलोकन केले.

७. अर्ज, दाखल कागदपत्रे आणि पक्षकारांतर्फे करण्यात आलेल्या युक्तीवादावरुन माझ्या विचारार्थ आलेले मुद्दे व त्या मुद्दयावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे दिलेले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासुन संरक्षण अपिल दाखल करण्यासाठी झालेला ३७ दिवसांचा विलंब माफ केला जाऊ शकतो की नाही ? | होय. |
| २) | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ –**

८. अर्जदारातर्फे विधिज्ञ यांनी आपल्या युक्तीवादात असे कथन केले की, अर्जदार हे कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि. येथे नोकरीस असल्याने व त्यांना वेळोवेळी मागणी करुन देखील रजा उपलब्ध न झाल्याने कागदपत्रांची पूर्तता वेळेवर करणे अशक्य झाले. तसेच दरम्यानच्या कालावधीत अर्जदार यास पाठदुखीचा त्रास सुरु झाला. त्यामुळे अर्जदाराला लांजा येथुन रत्नागिरी येथे प्रवास करुन येणे व वकीलांना प्रकरणाची माहिती देणे अशक्य झाले. अर्जदार यांनी हेतुतः उशिरा अपिल दाखल केलेले नाही. त्यामुळे प्रस्तुतचे अपिल दाखल करण्यास ३७ दिवसांचा विलंब झाला आहे.

९ सामनेवाला क्र.१ ते ४ तर्फे विधिज्ञांनी त्यास हरकत घेवुन अर्जदाराचा अर्ज

नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

१०. अर्जाप्रमाणे नि.६ च्या अंतरीम अर्जावरील आदेश दि.०५/१०/२०२४ रोजी पारीत करणेत आलेला आहे. अर्जदाराला रजा न मिळाल्याने तसेच दरम्यानच्या कालावधीत अर्जदार यास पाठदुखीचा त्रास सुरु झाल्यामुळे अर्जदार मुदतीमध्ये अपिल दाखल करु शकला नाही. या कथनांच्या पुष्टयर्थ अर्जदाराने नि.२ येथे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. अर्जदार हा आजारी असलेबाबतचे वैद्यकिय प्रमाणपत्र दाखल केलेले नाही. अर्जदार यांना आदेशाची नक्कल नेणेसाठी हजर राहणेची समज दि.२२/११/२०२४ रोजी दिल्याचे दिसते. सबब, अर्जदारांनी विलंब माफीच्या अर्जात दिलेले कारणाचे पुष्यर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केला असल्याचे दिसुन येत नाही.

११. परंतु याच वेळी येथे हे ही नमुद करणे गरजेचे आहे की, जिल्हा न्यायालयात अपिल दाखल करण्याची मुदत ३० दिवसांची आहे. त्यामुळे वर नमुद ३७ दिवसांचा विलंब हा फार मोठा आहे असे म्हणता येणार नाही. प्रस्तावित अपिल दाखल करण्याची अर्जदाराची संधी केवळ विलंबाच्या तांत्रिक मुद्दयावर नाकारणे योग्य होणार नाही. सदरचे अपिल किंवा प्रकरण गुणवत्तेवर ऐकुन निकाली करणे आवश्यक आहे. माझ्या मते विलंब माफीमुळे सामनेवाला यांना झालेली गैरसोय ही त्यांना योग्य तो खर्च देवुन सदरचा विलंब अर्ज मंजुर करणे आवश्यक आहे. सदरचा विलंब अर्ज मंजुर करुन दोन्ही पक्षकारांना त्यांचे प्रकरण गुणवत्तेवर चालविण्यास एक संधी देणे गरजेचे आहे. सदरचा विलंबाचा कालावधी विचारात घेता रक्कम रुपये १,२००/-(अक्षरी रुपये बाराशे मात्र) नुकसानीपोटी देणे बरोबर राहील.

१२. सदर प्रकरणाचा रोजनामा पाहता केवळ ३७ दिवसांच्या विलंब माफीसाठी जवळपास एक वर्षापेक्षा अधिक कालावधी खर्ची पडला आहे. त्यामुळे अपिल नोंदविले गेल्यानंतर पुन्हा पक्षकारांना नोटीस बजावणी करीता आणखी वेळेचा अपव्यय करणे योग्य होणार नाही असे वाटते. त्यामुळे अपिल नोंदणी झाल्यानंतर पक्षकारांनी दि.२०/०४/२०२६ रोजी अपिलाच्या प्राथमिक सुनावणीकरीता न्यायालयात हजर रहावे.

त्यासाठी वेगळ्या नोटीसा काढण्यात येणार नाहीत याची दोन्ही पक्षकारांना समज दिली. सबब खालील आदेश.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज खालील अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासुन संरक्षण अर्ज क्र.११/२०२१ मधील नि.६ च्या अर्जावरील दिनांक ०५/१०/२०२४ रोजी पारीत करण्यात आलेल्या अंतरीम आदेशाविरुध्द अपील दाखल करण्यासाठी अर्जदार यास झालेला ३७ दिवसांचा विलंब अर्जदार याने सामनेवाला यास रक्कम रुपये १,२००/– (अक्षरी रुपये बाराशे मात्र) देण्याचे अटीवर मंजूर.

**a**) सदरच्या खर्चाची रक्कम अर्जदारानी आजपासून दोन आठवडयात न्यायालयात जमा करावी.

**b**) सदर खर्चाची रक्कम सामनेवाला यांना समप्रमाणात देणेत यावी.

३. खर्चाची रक्कम भरल्यानंतर अपिल तपासणीस अधिन राहुन ते अपिल नोंदविण्यात यावे आणि दि.२०/०४/२०२६ रोजी प्राथमिक सुनावणीसाठी ठेवण्यात यावे.

४. पक्षकारांनी अपिलाच्या प्राथमिक सुनावणीसाठी दि.२०/०४/२०२६ रोजी न्यायालयात हजर रहावे. त्याकरीता वेगळ्या नोटीसा काढण्याची गरज नाही.

(खुल्या न्यायालयात आदेश देवुन जाहीर केला.)

VINOD YASHWANTRAO JADHAV

Digitally signed by VINOD YASHWANTRAO JADHAV
Date: 2026.03.27 16:43:00 +0530

दिनांकः–२४/०३/२०२६

**(व्ही.वाय.जाधव)**

**सत्र न्यायाधीश, रत्नागिरी.**

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Civil Misc.Appln- No. | :- | 40/2024. |
| Name of Stenographer | :- | A.B.Patil. |
| Court Name | :- | Sessions Court, Ratnagiri. |
| Date of Decision | :- | 24/03/2026 |
| Order signed by P.O. on | :- | 24/03/2026 |
| Judgment uploaded on | :- | 27/03/2026 |